दयानंद शिक्षण संस्था, लातूर संचलित

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर

आ नो भद्रा: क्रतवो यन्तु विश्वत:

# मासिक ई-मॅगझीन

JULY 2026

## महिना : जुलै २०२६

**महाविद्यालयात**
**आयोजित विविध शैक्षणिक, सांस्कृतिक,**
**क्रीडा व सामाजिक उपक्रमांचा आढावा सादर करणारे**
**मासिक ई-मॅगझीन.**











No : 123456789000000000





# दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव!

लातूर: "साधी राहणी आणि उच्च विचारसरणी" हा जीवनविचार स्वतः जगणारे आणि शैक्षणिक गुणवत्तेबद्दल प्रचंड तळमळ बाळगणारे दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य तथा आदर्श प्रशासक डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त आज लातूरसह संपूर्ण मराठवाड्याच्या शैक्षणिक, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रांतून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी आपल्या कुशल, शिस्तप्रिय आणि दूरदर्शी मार्गदर्शनाखाली असंख्य युवक-युवतींसमोर एक आदर्श निर्माण केला असून, दयानंद महाविद्यालयाने शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय व राज्य पातळीवर उल्लेखनीय प्रगती केली आहे. सरांच्या सक्षम प्रशासनाचेच हे फलित आहे की, दयानंद कला कनिष्ठ महाविद्यालयाला उत्कृष्ट कामगिरीबद्दल SQAAF 'A+' ग्रेड, तर कला महाविद्यालयाला 'नॅक' (NAAC) कडून 'A' मानांकन पटकावता आले आहे. यासोबतच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड द्वारे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ या वर्षाकरिता घेण्यात आलेल्या पारंपरिक अभ्यासक्रमांच्या 'ट्रिपल ए' (AAA) म्हणजेच ऑनलाईन अकॅडमीक अंकेक्षण तपासणी अंतर्गत कला महाविद्यालयाने 'AAA' मानांकनामध्ये 'O' ग्रेड मिळवण्याचा सर्वोच्च बहुमान प्राप्त केला आहे. सरांच्या याच प्रभावी मार्गदर्शनामुळे यंदाच्या अकरावी व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विभागातील प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेत कला महाविद्यालयामध्ये 'ऑनलाइन' व ऑफलाइन पद्धतीने सर्वात जास्त प्रवेश नोंदवले जाण्याचा ऐतिहासिक विक्रम दयानंद कला महाविद्यालयाने केला असून, हा पालकांचा आणि विद्यार्थ्यांचा महाविद्यालयावरील अढळ विश्वास दर्शवतो.

केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे, तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांचे मुख्य ध्येय असून, त्यांच्या विद्यार्थीकेंद्रित कार्यपद्धतीमुळे त्यांनी अनेक पिढ्यांना योग्य दिशा देण्याचे काम केले आहे. विद्यार्थ्यांच्या बुध्दीत ज्ञानाचे आणि हृदयात संस्काराचे बीज पेरणारे ते एक हक्काचे मार्गदर्शक ठरले आहेत. त्यांच्या या दूरदृष्टीमुळेच आज महाविद्यालयाने क्रीडा, सांस्कृतिक आणि शैक्षणिक गुणवत्ता या सर्वच क्षेत्रांत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात अव्वल स्थान पटकावले आहे. विशेष म्हणजे, सरांच्या यशस्वी नेतृत्वाखाली महाविद्यालयाने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ युवक महोत्सवामध्ये सलग तीन वेळा जनरल चॅम्पियनशिप ट्रॉफी मिळवण्याची अभूतपूर्व 'हॅट्रिक' साधली आहे. तसेच दयानंद कला महाविद्यालयाने आपल्या कॅम्पसमध्ये 'न भूतो न भविष्यती' असा दैदीप्यमान आणि ऐतिहासिक युवक महोत्सव घडवून आणत संपूर्ण विद्यापीठ क्षेत्रात आपल्या व्यवस्थापनाचा आणि भव्यतेचा एक नवा ठसा उमटवला आहे. त्यांच्या प्रत्येक निर्णयामागे संस्थेच्या प्रगतीची आंतरिक ओढ आणि अहोरात्र कष्ट स्पष्टपणे दिसून येतात.

महाविद्यालयीन सहकाऱ्यांच्या आणि विद्यार्थ्यांच्या कोणत्याही अडीअडचणीला तत्परतेने धावून जाणारे आणि समाजसेवेच्या कार्यातून माणुसकीची जपणूक करणारे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी सर्वांच्याच मनात आदराचे अढळ स्थान निर्माण केले आहे. प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांना दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष श्री. ललितभाई शाह, उपाध्यक्ष श्री. रमेशकुमार राठी, सचिव श्री. रमेश बियाणी, संयुक्तसचिव श्री. विशाल लाहोटी, सहायक सचिव ॲड. श्रीकांत उटगे, सहायक सचिव श्री. अजिंक्य सोनवणे आणि कोषाध्यक्ष श्री. संजय बोरा या सर्व सन्माननीय पदाधिकारी व संचालक मंडळाचे मोलाचे मार्गदर्शन, शुभ आशीर्वाद आणि पाठबळ लाभले आहे. वाढदिवसाचे औचित्य साधून संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांसह अनेक महाविद्यालयाचे प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सरांना प्रत्यक्ष भेटून आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून भावी आयुष्यासाठी व निरोगी आरोग्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.







# दयानंद कला महाविद्यालयात 2 री, 3 री व 4 थीच्या पुनर्रचित अभ्यासक्रमासाठी जिल्हास्तरीय शिक्षक प्रशिक्षणास प्रारंभ

लातूर, दि. २२ जून : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे तथा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET), मुरूड, जि. लातूर यांच्या वतीने २ री, ३ री व ४ थीच्या पुनर्रचित अभ्यासक्रमासंदर्भातील जिल्हास्तरीय शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे २२ जून ते २५ जून २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे.

हा प्रशिक्षण कार्यक्रम डायटचे प्राचार्य डॉ. मारुती सलगर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला आहे.

उद्घाटन समारंभात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी शिक्षकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, नव्या अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाला (स्किल डेव्हलपमेंट) विशेष महत्त्व देण्यात आले आहे. त्यामुळे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान देण्यापुरते मर्यादित न राहता त्यांच्यात विविध कौशल्ये विकसित करण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.

अध्यक्षीय समारोप करताना डायटचे प्राचार्य डॉ. मारुती सलगर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या विचारांच्या कक्षा रुंदावणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. "जोपर्यंत विद्यार्थ्यांच्या विचारविश्वाचा विस्तार होत नाही, तोपर्यंत त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकत नाही," असे ते म्हणाले.

प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील विविध शाळांमधील मराठी 180 व उर्दू 120शिक्षक सहभागी झाले असून नव्या अभ्यासक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरणार आहे. या प्रशिक्षणात सुलभक म्हणून परमेश्वर शृंगारे श्रीमती वर्षाराणी मुस्कावाड,

श्री शशिकांत नाब्दे,श्री बसवेश्वर थोटे,श्री बालभीम गायकवाड ,श्री अनिल बिरादार,श्री भीमाशंकर स्वामी,श्री सुनील सातपुते, श्री सूर्यकांत बोईनवाड श्री विजय राऊत,श्री.अंजली स्वामी,अधिव्याख्याता श्रीमती सुचित्रा जाधव, मुख्य संयोजक जेष्ठ अधिव्याख्याता श्री अनिल जाधव यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर संचलन श्रीमती ज्योती वंजे यांनी केले.



# दयानंद कला बहिस्थ शिक्षण केंद्रास उत्तम व्यवस्थापन सन्मान !



लातूर दि. १५ जुलै : दयानंद कला महाविद्यालयात गेल्या अनेक वर्षापासून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे बहिस्थ शिक्षण अभ्यास केंद्र सुरु आहे. या केंद्रात या विषयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू आहेत. दरवर्षी महाविद्यालयात उपस्थित राहू शकत नसलेले, पण शिक्षण पदवी) घेऊ इच्छित असलेले ज्ञानार्थी विद्यार्थी बहिस्थ शिक्षण अभ्यास केंद्राद्वारे शिक्षण घेतात. प्रस्तुत केंद्राच्या २०२५ - २६ च्या उत्तम व्यवस्थापनाबद्दल स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाने विशेष सत्कार सन्मान घोषित केला. आज दिनांक १५/०७/२०२५ रोजी बहिस्थ शिक्षण अंतर्गत सर्व संलग्नित अभ्यास केंद्राचे प्राचार्य तथा केंद्र समन्वयक यांची सहविचार सभा होती. या सभेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते प्रस्तुत सत्कार सन्मान देण्यात आले. याप्रसंगी दयानंद कला महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख तथा बहिस्थ शिक्षण केंद्र समन्वयक प्रा. डॉ. सुनीता सांगोले यांनी स्वीकारला. याप्रसंगी केंद्र समन्वयक प्राचार्य यांनी या क्षेत्रातील आपल्या अनुभवातून दूर शिक्षणात काय महत्त्वाचे बदल करता येतील याबद्दल सूचना दिल्या माननीय कुलगुरू यांनी केंद्र समन्वयक प्राचार्य यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांचे कौतुक करत काळानुरूप नवे अभ्यासक्रम सुरू करण्याच्या सूचने बद्दल त्यांनी कौतुक केले त्यात डॉ. सुनिता सांगोले यांनी मानसशास्त्र, पर्यटन व्यवस्थापन, भूगोल, बोलीविज्ञान यासारखे विषय सुचवले होते. याशिवाय उद्यमशीलता/ रोजगाराभिमुखता यावी म्हणून अभ्यासक्रमात नव्या अभ्यासक्रमांचा समावेश व्हावा, मराठीबरोबर इंग्रजी माध्यमातूनही हे अभ्यासक्रम द्यावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. प्राप्त झालेल्या सन्मानाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष मा. ललितभाई शहा, मा. रमेशकुमार राठी, सचिव मा. रमेश बियाणी, संयुक्त सचिव मा. विशाल लाहोटी, सहायक सचिव ॲड. श्रीकांतजी उटगे, सहायक सचिव अजिंक्य सोनवणे, कोषाध्यक्ष मा. संजयज बोरा या सर्व सन्माननीय पदाधिकारी व संचालक मंडळाचे मोलाचे मार्गदर्शन व पाठबळ लाभले. प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांची प्रेरणा व पूर्व केंद्र समन्वयक ज्यांच्या कार्यामुळे हा सन्मान प्राप्त झाला ते प्रा. डॉ. रमेश पारवे (सेवानिवृत्त इतिहास विभागप्रमुख)यांच्याबद्दल ऋण व्यक्त केले. मा. कुलगुरु यांनी डॉ सुनीता सांगोले यांनी मांडलेल्या सूचनांचे कौतुक करत त्यात फॉरेन लँग्वेजचाही समावेश असावा अशी पुष्टी जोडली. तसेच विद्यापीठ असे नवे अभ्यासक्रम करण्यास सहकार्य करेल. बहिस्थ शिक्षण विभागाने यासाठी प्रयत्नशील असायला हवे.असे मत व्यक्त केले. माननीय कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांनी केंद्राच्या अडचणी व सूचना समजून घेत केंद्रांच्या जबाबदाऱ्यांची जाणीवही करून दिली त्यांच्या मार्गदर्शनाने सर्व समन्वयक प्राचार्य यांच्या कार्यास प्रेरणा व उत्साह मिळाला.

# डॉ. दिलीप नागरगोजे यांचे इयत्ता 12 वी तत्त्वज्ञान


लातूर : दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील उपप्राचार्य तथा तत्त्वज्ञान विषयाचे प्राध्यापक डॉ. दिलीप नामदेव नागरगोजे यांच्या इयत्ता १२ वी तत्त्वज्ञान विषयावरील १२ शैक्षणिक व्हिडिओंचा समावेश 'दीक्षा' (DIKSHA) या भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाद्वारे सुरू करण्यात आलेल्या राष्ट्रीय डिजिटल शिक्षण व्यासपीठावर करण्यात आला आहे. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयासह लातूर जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

डॉ. दिलीप नागरगोजे गेल्या ३० वर्षांपासून तत्त्वज्ञान विषयाचे अध्यापन करत असून, राज्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व सुलभ शैक्षणिक साहित्य उपलब्ध व्हावे या उद्देशाने त्यांनी इयत्ता १२ वी तत्त्वज्ञान विषयाच्या संदर्भात अनेक ग्रंथाचे लेखन केले आहे. इयत्ता 12 वीच्या अभ्यासक्रमाबरोबरच त्यांनी इतर ग्रंथ लिहिले आहेत. त्यातील काही ग्रंथाची राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड च्या अभ्यासक्रमास निवड झाली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन१२ व्हिडिओंची 'दीक्षा' ॲपवर निवड करून प्रसारित केली आहे.

'दीक्षा' ॲपवरील या व्हिडिओंच्या माध्यमातून राज्यभरातील हजारो विद्यार्थी आणि शिक्षकांना तत्त्वज्ञान विषयाचा अभ्यास अधिक प्रभावी, सोपा आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने करता येणार आहे. डिजिटल शिक्षणाला चालना देणाऱ्या या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

या उपक्रमासाठी दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET), लातूरचे प्राचार्य डॉ. मारुती सलगर, अधिव्याख्याते श्री. अनिल जाधव व श्री. गिरीश माने, महाविद्यालयाचे पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, डॉ संदिपान जगदाळे प्रा. गोविंद मुंडे, प्रा. महेश जंगापल्ले, प्रा. इरफान शेख आणि कार्यालयीन अधीक्षक श्री. संजय व्यास यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

डॉ. दिलीप नागरगोजे यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक योगदानाबद्दल शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले असून, त्यांच्या या कार्यामुळे डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अधिक सक्षम आणि गुणवत्तापूर्ण अध्ययनाची संधी उपलब्ध झाली असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.



# 'डॉ. मेहुल राठोड यांची वैद्यकीय क्षेत्रातील जागा कुणीच घेऊ शकत नाही!'; लातूरमध्ये विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून भावपूर्ण आदरांजली




लातूर: येथील अत्यंत सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ आणि नामांकित 'एमजे हॉस्पिटल'चे संचालक डॉ. मेहुल राठोड यांचे १५ जुलै रोजी अकाली व दुर्दैवी निधन झाले. या धक्कादायक घटनेमुळे लातूर जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्याच्या वैद्यकीय क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. डॉ. मेहुल राठोड यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी यांच्या मार्गदर्शनाखाली दयानंद सभागृहात एका शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी वैद्यकीय, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला आणि भावपूर्ण आदरांजली वाहिली. वयाच्या अवघ्या काही वर्षांच्या यशस्वी कारकिर्दीत अनेक गंभीर रुग्णांना नवजीवन देणाऱ्या एका निष्णात डॉक्टरचा असा अचानक अंत व्हावा, या घटनेने संपूर्ण शहरात तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

दिवंगत प्रख्यात मधुमेहतज्ज्ञ डॉ. ईश्वर राठोड यांचे चिरंजीव असलेल्या डॉ. मेहुल यांनी वडिलांचा वैद्यकीय सेवेचा वारसा अत्यंत सक्षमपणे पुढे चालवला होता. एम.डी. (MD) आणि डी.एन.बी. (DNB) या प्रगत पदव्यांसह १० वर्षांपेक्षा जास्त क्लिनिकल अनुभव असलेल्या डॉ. मेहुल राठोड यांनी लातूरमधील बार्शी रोड येथील एमजे हॉस्पिटलच्या माध्यमातून इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजीमध्ये एक विश्वासार्ह नाव कमावले होते. अँजिओप्लास्टी आणि हृदयाच्या लयीचे व्यवस्थापन यांसारख्या गुंतागुंतीच्या हृदयविकारांवर जागतिक दर्जाचे उपचार स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्यात त्यांचे विशेष प्राविण्य होते.

शोकसभेत बोलताना दयानंद शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष श्री. ललितभाई शाह यांनी एका हृदयस्पर्शी प्रसंगाची आठवण सांगितली. ते म्हणाले, "वेळ अमावास्येच्या दिवशी माझी पत्नी आजारी असताना मी डॉ. मेहुल यांना फोन केला. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता 'तुम्ही घरून हॉस्पिटलमध्ये पोहोचेपर्यंत मी शेतातून थेट हॉस्पिटलमध्ये येतो' असा शब्द दिला आणि तो पाळला. रुग्णाप्रती त्यांची ही बांधिलकी थक्क करणारी होती." दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव श्री. रमेश बियाणी यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, "दयानंद शिक्षण संस्थेचे सदस्य असलेले डॉ. मेहुल हे एक स्वप्न पाहणारे आणि ते प्रत्यक्षात उतरवणारे डॉक्टर तर होतेच, पण त्यापेक्षाही ते जनसामान्यातील अत्यंत मनमिळावू माणूस होते. रुग्णांचे दुःख आपले मानून सेवा करणारा तो एक उत्तम डॉक्टर होता. दयानंद संस्थेशी त्यांचे व त्यांच्या वडिलांचे जुने नाते होते, हा ऋणानुबंध भविष्यातही कायम राहील."

लातूरचे माजी महापौर श्री. विक्रांत गोजमगुंडे यांनी डॉ. मेहुल यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, "कोविडच्या अत्यंत कठीण काळात डॉ. मेहुल राठोड यांच्याशी माझा ऋणानुबंध अधिक दृढ झाला. प्रत्येक पेशंटला आत्मीयतेने तपासणारा हा डॉक्टर आपल्यामधून निघून गेला आहे. ही केवळ राठोड कुटुंबाची नव्हे, तर संपूर्ण लातूर जिल्ह्याची कधीही भरून न निघणारी हानी आहे." ज्येष्ठ विचारवंत श्री. अतुल देऊळगावकर यांनी, डॉ. मेहुल हे आपल्या नावाप्रमाणेच सर्वांवर सुखाचा वर्षाव करणारे, रुग्णांशी मानवतावादी नाते राखणारे आणि चोवीस तास फोनवर उपलब्ध राहून गरजूंना आर्थिक मदत करणारे देवमाणूस होते, अशा शब्दांत त्यांच्या ख्यातीचा उल्लेख केला.

एमआयटीचे सन्माननीय सदस्य डॉ. हनुमंत कराड यांनी, डॉ. मेहुल यांच्यासारखा आदर्श विद्यार्थी आणि डॉक्टर पुन्हा होणे नाही, अशा भावना व्यक्त करत लातूरमधील कार्डिओलॉजिस्टचे एक मोठे स्वप्न अपूर्ण राहिल्याचे सांगितले. डॉ. मेहुल यांचे सासरे श्री दिगंबर मालेकर यांनी, "ते अत्यंत हुशार आणि सुसंस्कारी होते, मी जेव्हा जेव्हा त्यांच्याकडे जायचो, ते नेहमी माझ्या पाया पडून आशीर्वाद घ्यायचे आणि नंतरच माझी तपासणी करायचे. त्यांचे जाणे आमच्यासाठी अत्यंत अनाकलनीय व धक्कादायक आहे," असे सांगताना जुन्या आठवणींना उजाळा दिला.

शोकसभेदरम्यान डॉ. मेहुल राठोड यांचे शेजारी श्री. निलेश ठक्कर यांनी "लातूरमधील ईश्वराचा अवतार हरवला" अशा शब्दांत शोक व्यक्त केला, तर श्री. जयवंतराव काथवटे यांनी सर्वांना 'काका' म्हणणाऱ्या या प्रेमळ पुतण्याला गमावल्याचे दुःख मांडले. याशिवाय श्री. हर्षवर्धन राव, श्री. प्रभू माळी, गुजराती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. कमलेश ठक्कर, रोटरी परिवारातर्फे श्री. सुनील कोचेटा आणि त्यांचे बालमित्र डॉ. संगमेश चवंडा यांनी डॉ. मेहुल यांच्या हसऱ्या आणि आश्वासक स्वभावाचा गौरव केला. डॉ. अशोक दामोसकर यांनी सांगितले की, डॉ. मेहुल यांना रुग्णाविषयी उपजत तीव्र सहानुभूती होती. केवळ रोगाचे निदान करणे म्हणजे भौतिक विकास नाही, तर माणसाचे माणूसपण महत्त्वाचे आहे, हा वारसा त्यांना वडिलांकडून मिळाला होता आणि कठोर मेहनतीच्या आधारे त्यांनी रुग्णांच्या मनाचा अभ्यास केला केला होता. वैद्यकीय क्षेत्रात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण करून गेलेल्या या महान डॉक्टरांना लातूरकरांच्या वतीने अत्यंत जड अंतःकरणाने आणि अश्रूभूर्ण नयनांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



# 'प्रत्येक ग्रंथापर्यंत वाचक, वाचकापर्यंत ग्रंथ' : आनंददायी शनिवार उपक्रमातून दयानंद कला अकरावीच्या विद्यार्थ्यांची ज्ञानयात्रा'.

लातूरः महाराष्ट्रातील सर्वात मोठे आणि समृद्ध ग्रंथालय म्हणून नावलौकिक असलेल्या दयानंद कला महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला इयत्ता अकरावीच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांनी भेट दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे व पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित यांनी 'आनंददायी शनिवार' हा अभिनव उपक्रम राबविला. या अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ग्रंथालयातील पुस्तके पाहण्याची आणि हाताळण्याची सुवर्णसंधी मिळाली. हा उपक्रम शनिवारी अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

ग्रंथालय भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, डॉ. गोपाल बाहेती आणि डॉ. संदीपान जगदाळे व प्रा. विलास कोमटवाड यांनी विविध विषयांवरील पुस्तके, दुर्मिळ संदर्भग्रंथ आणि नियतकालिके यांची सविस्तर माहिती दिली. तसेच ग्रंथालयातील उपलब्ध आधुनिक सुविधा, वाचन पद्धती आणि संदर्भ शोधण्याच्या तंत्रांबाबत विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी वाचनाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, "वाचन ही व्यक्तिमत्त्व विकासाची किल्ली असून ज्ञान, विचारसंपदा आणि सर्जनशीलता वाढविण्याचे ते एक प्रभावी साधन आहे. विद्यार्थ्यांनी दररोज थोडा वेळ वाचनासाठी दिला पाहिजे आणि या भव्य ग्रंथालयाचा आपल्या प्रगतीसाठी अधिकाधिक उपयोग केला पाहिजे."

या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल आणि दयानंद कला महाविद्यालयाच्या समृद्ध ग्रंथालयाबद्दल विद्यार्थ्यांनी अत्यंत आनंद व्यक्त केला. ग्रंथालय भेटीनंतर आपल्या भावना व्यक्त करताना गोविंद चव्हाण या विद्यार्थ्याने सांगितले की, "मी यावर्षी दयानंद कला महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे. या ग्रंथालयात एक लाख सहा हजारपेक्षा जास्त पुस्तके आहेत, जे महाराष्ट्रात एक अद्वितीय रूप आहे. हे पाहून मला खूप आनंद झाला आणि या महाविद्यालयात प्रवेश घेतल्याचा सार्थ अभिमान वाटत आहे." तसेच शेख अमन याने सांगितले की, "आम्ही ११ वीच्या वर्गातील सर्व विद्यार्थी आज येथे आलो आहोत. या उपक्रमामुळे आम्हास अनेक पुस्तकांची महत्त्वपूर्ण माहिती मिळाली असून हा उपक्रम आम्हा सर्व विद्यार्थ्यांना खूप आवडला आहे."

महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर पहिल्यांदाच एवढे मोठे ग्रंथालय पाहिले असल्याचे सांगताना पलक पाटील म्हणाली की, "या भव्य ग्रंथालयाची आणि येथील पुस्तकांची सविस्तर माहिती मिळाल्यानंतर वाचनासाठी मोठी प्रेरणा मिळाली आहे, ज्यामुळे आम्हाला खूप आनंद होत आहे." तर ओम जाधव या विद्यार्थ्याने, "दयानंद महाविद्यालयाच्या या ग्रंथालयात आल्यानंतर मला प्रचंड आनंद झाला. येथे एक लाखापेक्षाही जास्त पुस्तकांचा साठा उपलब्ध आहे. एवढी पुस्तके एकाच छताखाली पाहण्याचा अनुभव खरोखरच थक्क करणारा होता," अशा शब्दांत आपले मत मांडले.

त्यानंतर ११ वीच्या वर्गातील विद्यार्थिनी सलोनी शेख, पूजा भोर व राधिका सहानी यांनी आपली एकत्रित प्रतिक्रिया नोंदवताना सांगितले की, "आज ग्रंथालयातील पुस्तकांचा हा अथांग सागर पाहून खूप छान वाटले. महाविद्यालयाने आमच्यासाठी इतके मोठे साहित्य उपलब्ध करून दिले आहे, याचा सर्व विद्यार्थ्यांनी अवश्य लाभ घेतला पाहिजे. येथे मोफत मिळणाऱ्या या ज्ञानभांडाराचे आपण मोल राखले पाहिजे आणि जास्तीत जास्त वाचन केले पाहिजे."

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध पुस्तकांचे अवलोकन केले आणि वाचनाविषयीची आपली आवड व्यक्त केली. ग्रंथालयाचा नियमित वापर करण्याची प्रेरणा घेऊनच प्रत्येक विद्यार्थी बाहेर पडला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्रा. दिनेश जोशी, प्रा. सुरेश क्षीरसागर, प्रा. दशरथ ननवरे, डॉ. सुधीर गाडवे, प्रा. अनिल भुरे, प्रा. महेश जंगापल्ले, ग्रंथपाल श्रीकांत जोशी, श्री ठाकूर, श्री बंडू यांनी विशेष परिश्रम घेतले.



# लातूरच्या दयानंद कला महाविद्यालयात अकरावीचे सर्व 480 प्रवेश पूर्ण; महाराष्ट्रात विक्रमी कामगिरी

लातूर : दयानंद कला महाविद्यालय, लातूरने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये इयत्ता अकरावी कला शाखेच्या सर्व ४८० जागांवरील प्रवेश यशस्वीरीत्या पूर्ण करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागातील चारही तुकड्यांतील सर्व जागा भरल्याने विद्यार्थी, पालक आणि शिक्षण क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष तथा शालेय समितीचे अध्यक्ष श्री. ललितभाई शाह, सचिव श्री. रमेश बियाणी, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे आणि पर्यवेक्षक प्रशांत दीक्षित यांनी नूतन प्रवेशित विद्यार्थ्यांचे, प्राध्यापकवृंदाचे तसेच कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच साहित्य, संगीत, कला, क्रीडा, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि विविध सहशैक्षणिक उपक्रमांमधील उल्लेखनीय यशामुळे विद्यार्थी व पालकांचा विश्वास संपादन केला आहे. यंदा दहावीमध्ये ३९ टक्के गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांपासून ते सीबीएसई बोर्डात ९६ टक्के गुण मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांपर्यंत विविध स्तरांतील विद्यार्थ्यांनी दयानंद कला महाविद्यालयाची निवड केली आहे.


दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी म्हणाले, "गुणवंत, सुसंस्कारी आणि जबाबदार पिढी घडवणे हे संस्थेचे प्रमुख ध्येय आहे. कला शाखेत करिअरच्या अनेक संधी उपलब्ध असून, विद्यार्थ्यांनी दयानंद महाविद्यालयावर दाखवलेला विश्वास हा आमच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा सन्मान आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीसाठी संस्था भविष्यातही कटिबद्ध राहील."

प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी सांगितले की, "स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच सर्वांगीण विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे ही आमची प्राथमिकता आहे. अत्याधुनिक डिजिटल वर्गखोल्या, अद्ययावत संगणक प्रयोगशाळा, समृद्ध ग्रंथालय, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक व क्रीडा विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना दिली जाते. तसेच संस्थेच्या वतीने कला, क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी लाखो रुपयांच्या शिष्यवृत्तीद्वारे प्रोत्साहन दिले जाते."

उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी सांगितले की, "अनुभवी व समर्पित प्राध्यापकवर्ग, नियमित अध्यापन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, विद्यार्थीकेंद्रित उपक्रम आणि कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे नियोजनबद्ध कार्य यामुळेच महाविद्यालय विद्यार्थ्यांची पहिली पसंती ठरले आहे. प्रवेश प्रक्रियेत प्रत्येक विद्यार्थ्याला योग्य मार्गदर्शन करून त्याचा विश्वास संपादन करण्यात संपूर्ण महाविद्यालयीन परिवाराचा मोलाचा वाटा आहे. हे यश सर्वांच्या सांघिक प्रयत्नांचे फलित आहे."

अकरावीच्या सर्व ४८० जागा पूर्ण भरल्याने दयानंद कला महाविद्यालयाने गुणवत्तापूर्ण शिक्षणावरील विद्यार्थी आणि पालकांचा दृढ विश्वास पुन्हा एकदा अधोरेखित केला असून, नव्या शैक्षणिक वर्षाची दमदार सुरुवात केली आहे.

# दयानंद कला महाविद्यालयात अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी आत्मविश्वास वाढविणारी विशेष समुपदेशन कार्यशाळा



लातूर : विद्यार्थ्यांनी स्वतःमधील गुण, दोष आणि कौशल्यांची जाणीव ठेवून सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारल्यास कोणत्याही आव्हानाला यशस्वीपणे सामोरे जाता येते. "I'm OK, You're OK" हा जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे प्रतिपादन दयानंद शिक्षण संस्थेच्या मानसोपचारतज्ज्ञ व समुपदेशक श्रीमती वैशाली सेठ यांनी केले.

स्थानिक दयानंद कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित विशेष समुपदेशन व मार्गदर्शन कार्यशाळेत त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे आणि पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित यांच्या पुढाकाराने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

आपल्या मार्गदर्शनात वैशाली सेठ यांनी दहावीनंतर अकरावीमध्ये प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यांसमोर उभ्या राहणाऱ्या विविध आव्हानांवर सविस्तर प्रकाश टाकला. वाढलेला अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षांची तयारी, भविष्यातील करिअरची चिंता, पौगंडावस्थेतील भावनिक बदल आणि त्यातून निर्माण होणारा तणाव यांचा सकारात्मक पद्धतीने सामना करण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना उपयुक्त मार्गदर्शन केले.

यावेळी त्यांनी प्रभावी संवाद कौशल्य, अभ्यासाचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन, परीक्षेची भीती कमी करण्यासाठी ध्यान व रिलॅक्सेशन तंत्राचा वापर, तसेच मानसिक आरोग्य जपण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. समुपदेशनामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास, अभ्यासातील एकाग्रता सुधारण्यास आणि तणावमुक्त वातावरणात शिक्षण घेण्यास निश्चितच मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यशाळेस इयत्ता अकरावीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी NSS विभागीय समन्वयक डॉ. संदीपान जगदाळे, कार्यक्रमाधिकारी प्रा. अनिल भुरे, प्रा. सुरेश क्षीरसागर, प्रा. दशरथ ननवरे, डॉ. सुधीर गाडवे आणि प्रा. महेश जंगापल्ले यांनी विशेष परिश्रम घेतले.

# 'भारतीय संविधान आणि प्रशासन' या संदर्भग्रंथाचे कुलगुरूंसह मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन



लातूर, दि. २० जुलै : नवीन शैक्षणिक धोरणानुसार पदवी व पदव्युत्तर लोकप्रशासन, राज्यशास्त्र विषयाच्या अध्ययन-अध्यापनाला नवी दिशा देणारा तसेच स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणारा 'भारतीय संविधान आणि प्रशासन' हा संदर्भग्रंथ आज मान्यवरांच्या शुभहस्ते प्रकाशित करण्यात आला. अभ्यासपूर्ण मांडणी, अद्ययावत माहिती आणि संविधान व प्रशासन यांचा समन्वित अभ्यास सुलभ करणारा हा ग्रंथ विद्यार्थी, संशोधक आणि स्पर्धा परीक्षांच्या उमेदवारांसाठी महत्त्वाचा ठरणार असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी, संस्थेचे सचिव मा. श्री. रमेशजी बियाणी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे कुलगुरू मा. डॉ. मनोहर चासकर, दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, तसेच संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड यांच्या शुभहस्ते या ग्रंथाचे प्रकाशन संपन्न झाले.

या ग्रंथाचे लेखक प्रा. डॉ. रामेश्वर खंदारे यांनी भारतीय संविधानातील मूलभूत तत्त्वे, शासनव्यवस्था, लोकप्रशासनाची संकल्पना, प्रशासकीय रचना, घटनात्मक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच समकालीन प्रशासकीय घडामोडींचे सुसंगत आणि अभ्यासपूर्ण विवेचन या ग्रंथातून केले आहे. त्यामुळे विद्यापीठीन अभ्यासक्रमाबरोबरच एमपीएससी, यूपीएससी तसेच इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त संदर्भग्रंथ ठरणार आहे.

यावेळी मान्यवरांनी प्रा. डॉ. रामेश्वर खंदारे यांचे अभिनंदन करताना ज्ञाननिर्मिती आणि गुणवत्तापूर्ण साहित्यनिर्मिती ही उच्च शिक्षण क्षेत्राची महत्त्वपूर्ण गरज असल्याचे सांगितले. अभ्यासकांना विश्वासार्ह, अद्ययावत आणि संशोधनाधिष्ठित संदर्भसाहित्य उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा ग्रंथ मोलाचे योगदान देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

लेखक प्रा. डॉ. रामेश्वर खंदारे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, संविधान आणि लोकप्रशासन या विषयांचा सखोल अभ्यास विद्यार्थ्यांना सहज आणि सुलभ पद्धतीने करता यावा, तसेच स्पर्धा परीक्षेच्या उमेदवारांना एकाच ग्रंथातून दर्जेदार व परिपूर्ण मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने या ग्रंथाची निर्मिती करण्यात आली आहे.

# दयानंद कला महाविद्यालयात लोकमान्य टिळक जयंती उत्साहात साजरी




लातूर:: स्थानिक दयानंद कला महाविद्यालयात भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे महान सेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या शुभहस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी लोकमान्य टिळकांच्या क्रांतिकारी जीवनकार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. लोकमान्य टिळक यांचा स्वातंत्र्य चळवळीत अत्यंत सक्रिय व निर्णायक सहभाग होता. समाजात ऐक्य, बंधुता आणि संघटन निर्माण करण्यासाठी त्यांनी सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती उत्सवाची सुरुवात केली. लोकमान्य टिळक हे केवळ थोर समाजसुधारकच नव्हते, तर ते एक लेखक व विचारवंतही होते. मंडालेच्या तुरुंगवासात असताना त्यांनी अत्यंत क्लिष्ट अशा 'गीतारहस्य' ग्रंथाचे लेखन केले.

पुढे बोलताना प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे जहाल विचारसरणीचे आणि अत्यंत निर्भीड वृत्तीचे नेते असल्याचे सांगितले. त्यांच्या याच आक्रमक बाण्यामुळे इंग्रज सरकारला सळो की पळो करून सोडले होते. याच कारणामुळे त्यांना 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हणून ओळखले जाते. त्यांनीच देशवासियांना सर्वात प्रथम 'स्वदेशीचा' नारा दिला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता अनेकदा तुरुंगवास भोगणाऱ्या या महान जननायकाचे योगदान आपण नेहमी स्मरणात ठेवले पाहिजे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनमूल्यांचा व गुणांचा आपल्या आयुष्यात अवलंब करावा, तसेच शिक्षकांनीही आपल्या माध्यमातून एक सुजाण व आदर्श नागरिक कसा घडेल यासाठी सदैव तत्पर राहावे, असे आवाहन त्यांनी या वेळी केले.

या सोहळ्यास महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, आयक्यूएसी समन्वयक डॉ. संतोष पाटील, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित आणि कार्यालयीन अधीक्षक श्री. संजय व्यास यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, सेवक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी शासन निर्णयाचे सामूहिक वाचन करावे – प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन

लातूर : महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA), पुणे आणि दयानंद कला महाविद्यालय, लातूरच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी त्रिदिवसीय प्रशासकीय प्रशिक्षण कार्यक्रमा चा समारोप दयानंद कला महाविद्यालयात उत्साहात पार पडला.

समारोप सत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे प्र-कुलगुरू मा. डॉ. अशोक महाजनसर यांनी प्रशासकीय कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शासन निर्णयांचे सामूहिक वाचन करण्याची सवय प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी अंगीकारली पाहिजे. शासन निर्णयांचा योग्य अर्थ समजून घेतल्यास त्यांची प्रभावी अंमलबजावणी करता येते आणि संस्थेचे प्रशासन अधिक पारदर्शक, उत्तरदायी व कार्यक्षम बनते, असे त्यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले की, उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. कार्यालयीन कामकाज, विद्यार्थी सेवा, नोंदवही व्यवस्थापन, डिजिटल प्रशासन आणि शासनाच्या धोरणांची अंमलबजावणी या सर्व बाबींमध्ये त्यांचे योगदान मोलाचे आहे. त्यामुळे त्यांनी अद्ययावत ज्ञान, संवादकौशल्य, वेळेचे व्यवस्थापन, तंत्रज्ञानाचा वापर आणि सेवाभाव विकसित करणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड होते. अध्यक्षीय मनोगतात त्यांनी प्रशासकीय प्रशिक्षणामुळे कर्मचाऱ्यांमध्ये नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि आत्मविश्वास विकसित होतो. बदलत्या शैक्षणिक व प्रशासकीय व्यवस्थेत तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, वेळेचे नियोजन आणि जबाबदारीची जाणीव ही प्रत्येक प्रशासकीय कर्मचाऱ्याने आत्मसात करणे आवश्यक आहे. सातत्याने प्रशिक्षण घेतल्यामुळे कार्यक्षमता वाढते, संवाद अधिक प्रभावी होतो आणि संस्थेची गुणवत्ता उंचावण्यास मदत होते. प्रशासकीय कर्मचारी हे संस्थेच्या प्रगतीचे महत्त्वाचे भागीदार असून त्यांच्या नेतृत्वक्षमतेचा विकास ही काळाची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे कौशल्य विकसित करण्यासाठी अशा प्रशिक्षण कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन होणे आवश्यक असल्याचे सांगितले. समारोप सत्रास श्री. राहुल पोखरकर, कार्यकारी सहाय्यक, प्रशासकीय विभाग, MSFDA, पुणे, श्री. आदित्य बच्चेवार, कार्यक्रम सहाय्यक, विकास केंद्र, MSFDA, पुणे, प्रा. डॉ. संतोष पाटील, संचालक IQAC व कार्यालयीन अधिक्षक श्री. संजय व्यास यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. माधव गायकवाड यांनी केले. प्रशिक्षणार्थी प्रतिनिधी म्हणून सौ. निर्मला दहीरे, श्री. बाळकृष्ण अडसूळ, श्री. रामकृष्ण शिंदे, सौ. अश्विनी सुरवसे, श्री. दिलीप गिरबने, श्री. प्रसाद प्रयाग आणि श्री. विक्रमसिंह ठाकूर यांनी त्रिदिवसीय प्रशासकीय प्रशिक्षण कार्यक्रमातुन आमच्या ज्ञानात भर पडली. विद्यार्थ्यांशी प्रभावी संवाद कसा केला पाहिजे ,कामाचा ताण न घेता दैनंदिनी कार्य कसे केले पाहिजे व वेळेचे व्यवस्थापन कसे करावे याची माहिती आम्हाला मिळाली असे आपल्या मनोगतातून व्यक्त केले. प्रशिक्षण कार्यक्रमात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रशिक्षणादरम्यान कार्यालयीन कार्यपद्धती, ई-ऑफिस, डिजिटल कौशल्ये, संवादकौशल्य, ताणतणाव व्यवस्थापन आणि प्रशासकीय कार्यक्षमता या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. आभार प्रदर्शन कु. रोहिणी सांडूर यांनी केले, तर सूत्रसंचालन श्री. सुनील खडबडे यांनी केले.





# दयानंद कला व विज्ञान महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्सकडून कारगिलच्या वीर जवानांचे स्मरण; अमर शहीदांना नम्र अभिवादन




लातूर : दयानंद कला व विज्ञान महाविद्यालय आणि ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, लातूर यांच्या वतीने २६ जुलै २०२६ रोजी 'कारगिल विजय दिवस समारोह' जिल्हा क्रीडा संकुल, लातूर येथे अत्यंत शिस्तबद्ध आणि देशप्रेमाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या सोहळ्याचे औचित्य साधून अमर शहीदांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

हा उपक्रम दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच कॅप्टन डॉ. विजेंद्र चौधरी व डॉ. शिवकुमार राऊतराव यांच्या सुयोग्य नियोजनाखाली पार पडला.

कारगिल युद्धातील अमर शहीदांना आणि देशाच्या सुरक्षेसाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शूर जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सर्व उपस्थितांनी एकत्र येऊन आदर व्यक्त केला. १६ ते १८ हजार फूट उंचीवर ३ मे १९९९ पासून सुरू झालेल्या 'ऑपरेशन विजय'मध्ये ५२७ भारतीय जवानांनी मातृभूमीसाठी आपल्या प्राणांची आहुती दिली आणि शत्रूचा पराभव केला. या ऐतिहासिक पराक्रमाचे आणि शूर जवानांच्या बलिदानाचे स्मरण करत उपस्थितांनी शहीदांना नम्र अभिवादन केले.

या सोहळ्यात लातूर जिल्ह्यातील उपस्थित वीरपत्नींना विशेष सन्मानाने व्यासपीठासमोर स्थान देण्यात आले होते. सर्वप्रथम वीरपत्नींच्या हस्ते शहीद जवानांच्या प्रतिमेस पुष्पचक्र अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष व कार्यकारिणी सदस्य, उपस्थित मान्यवर आणि एनसीसी कॅडेट्स यांनी पुष्पमाला अर्पण करून शहीदांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. या उपक्रमातून युवा वर्गात देशभक्तीची आणि सैनिकांप्रती कृतज्ञतेची तीव्र भावना जागृत झाली.

या प्रसंगी ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे कर्नल संतोष नवगन, कर्नल वाय. बी. सिंग, कॅप्टन डॉ. विजेंद्र चौधरी, सुभेदार संजय चिकणे, नायब सुभेदार होळकर शिवाजी, हवालदार शिंदे संभाजी, दयानंद कला व विज्ञान महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी दयानंद कला व विज्ञान महाविद्यालयातील सर्व एनसीसी विद्यार्थ्यांचा (कॅडेट्स) अत्यंत सक्रिय सहभाग होता.

# मासिक ई-मॅगझीन

महिना : जुलै २०२६

संपर्क
दयानंद कला महाविद्यालय, लातूर
ईमेल : daclatur@rediffmail.com वेबसाईट : www.daclatur.org

आभार
या ई-मॅगझीनच्या निर्मितीसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व शिक्षक,
विद्यार्थी व कर्मचारी यांचे मनःपूर्वक आभार.